# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

गणेशखिंड, पुणे – ४११००७

## Savitribai Phule Pune University

Ganeshkhind, Pune - 411007

दूरध्वनी क्रमांक : ०२०-२५६२१२०५
Telephone No.: 020-25621205
Email:pgadmis@pun.unipune.ac.in

शैक्षणिक प्रवेश विभाग
P.G. Admission Section
Website: www.unipune.ac.in


## परिपत्रक

**विषय :– ''दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष सप्ताह राबविणेबाबत...''**

**संदर्भ :– १. मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे संदर्भ पत्र.क्र. महाडीबीटी–२०२४–२५/शिष्यवृत्ती शाखा/८१३१, दि. १३/११/२०२४.**
**२. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संदर्भ पत्र.क्र. उशिसं शिष्य–२०२४–२५/डीबीटी, दि. २७/०९/२०२४.**
**३. मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे संदर्भ पत्र.क्र. ससं/उशि/शिष्यवृत्ती विशेष सप्ताह/पुवि/२०२४, दि. २७/०९/२०२४.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, पुणे विभाग यांचे संदर्भ पत्र क्र. २ अन्वये महाडीबीटी पोर्टवर उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या एकूण १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. सदरहू शिष्यवृत्ती योजनांची सविस्तर माहिती https://mahadbt.maharashtra.gov.in तसेच https://dhepune.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

संचालनालयाचे दिनांक ०५/०८/२०२४ रोजीच्या परिपत्रकान्वये, विद्यार्थ्यांनी नमूद संकेतस्थळावर अर्ज कसा भरावा याबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. तसेच फी मंजुरीबाबत सविस्तर माहिती महाविद्यालयांना देण्यात आलेली आहे. तसेच दि. २७/०९/२०२४ रोजी याआगोदर परिपत्रकाद्वारे कळविले आहे. मा. शिक्षणसंचालक यांच्याकडून वेळोवेळी ऑनलाईन मिटींग, सूचना, परिपत्रक, दूरध्वनीद्वारे कळवून देखील उच्च शिक्षण विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांचे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तुलनेमध्ये अतिशय कमी ऑनलाईन अर्ज महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त झाले आहेत.

सबब, मा. विभागप्रमुख/संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/संकुल व मा. प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांचे अर्ज भरणेकरिता दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष सप्ताह राबविण्यात यावा, याबाबत सोबत जोडलेल्या परिपत्रकान्वये कार्यवाही करण्यात यावी.

गणेशखिंड पुणे – ७
संदर्भ : शै. प्रवेश/3703
दिनांक : १८/११/२०२४

(सही) 18/11/2024
(डॉ. मुंजाजी वि. रासवे)
उपकुलसचिव,

**सोबत : वरीलप्रमाणे.**

**प्रत:**

१. मा. प्राचार्य/मा. संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था, प्रस्तुत विद्यापीठ.
२. मा. विभागप्रमुख/मा. संचालक, सर्व शैक्षणिक विभाग/संकुल, प्रस्तुत विद्यापीठ.

D:\Vishnu\MAHADBT Circular 2022-23.docx

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण

**१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१**

Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info

फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२


जा.क्र. महाडीबीटी-२०२४-२५/शिष्यवृत्ती शाखा/८१३१ दिनांक : १३.११.२०२४

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.

३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.

४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.

५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.

६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

७. कुलसचिव, श्रीमती नथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई.

८. कुलसचिव, कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक.

**विषय : - दिनांक २५ नोव्हेंबर, २०२४ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष सप्ताह राबविण्याबाबत.**

संदर्भ : - १. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०२४-२५/डीबीटी/६०२५४३ दि. २७.०९.२०२४.
२. शिक्षण संचालनालय, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि. १३.११.२०२४ रोजीच्या शिष्यवृत्तीच्या बैठकीमध्ये दिलेल्या सूचना.

उपरोक्त विषयान्वये, सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालय, सर्व अकृषि विद्यापीठे, सर्व संस्थांना विशेष मोहिमे अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता महाडीबीटी पोर्टलवरुन उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन अर्ज विशेष सप्ताह राबवून विद्यार्थ्यांकडून भरुन घेण्याबाबत या कार्यालयामार्फत दि. २७.०९.२०२४ रोजी याअगोदरच परिपत्रकाद्वारे कळविले आहे. या कार्यालयाकडून वेळोवेळी ऑनलाईन मिटींग, सूचना, परिपत्रक, दूरध्वनीद्वारे कळवूनदेखील उच्च

शिक्षण विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांचे प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तुलनेमध्ये अतिशय कमी ऑनलाईन अर्ज महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त झाले आहेत.

जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत याकरीता उच्च शिक्षण, पुणे विभाग अधिनस्त पुणे शहर, पुणे ग्रामीण, अहमदनगर जिल्हा आणि नाशिक जिल्हा मधील सर्व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालय, सर्व अकृषि विद्यापीठे, सर्व संस्थांनी दिनांक २५ नोव्हेंबर , २०२४ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत शिष्यवृत्ती आवेदन पत्र भरण्यासाठी विशेष सप्ताह राबवून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचे ऑनलाईन आवेदन पत्र भरण्याकरिता महाविद्यालय स्तरावर संगणक सुविधा, इंटरनेट सुविधा उपलब्ध करुन देऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज करण्यास प्रोत्साहित करावे. सर्व महाविद्यालय, संस्था आणि विद्यापीठ यांनी महाडीबीटी पोर्टलवर विशेष मोहिमे अंतर्गत राबविण्यात आलेल्या सप्ताहाच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल प्रस्तुत कार्यालयास सादर करावयाचा आहे.

(डॉ. अशोक उबाळे)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
पुणे विभाग, पुणे